# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:26.05.2025** **वार:सोमवार**

---

1. ऑपरेशन सिंदूर बदलत्या भारताचं प्रतिबिंब आहे; पंतप्रधानांचं मन की बातमध्ये प्रतिपादन
2. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत सुशासनावर विचारमंथन; ऑपरेशन सिंदूरच्या यशाबद्दल अभिनंदनाचा ठराव
3. भारतीय अर्थव्यवस्था जगातली चौथी मोठी अर्थव्यवस्था
4. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आजपासून दोन दिवसांच्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर
5. खेलो इंडिया बीच स्पर्धेत 20 पदकं जिंकत महाराष्ट्राचा संघ उपविजेता आणि
6. मान्सून दक्षिण कोकणात दाखल; आगामी दोन दिवसही राज्यात जोरदार पावसाचा अंदाज

**मन की बात**

ऑपरेशन सिंदूर केवळ एक लष्करी मोहिम नाही, तर ती आपला निर्धार, धैर्य आणि बदलत्या भारताचं प्रतिबिंब आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आकाशवाणीवरील 'मन की बात' कार्यक्रमाच्या 122 व्या भागातून काल त्यांनी देशातल्या नागरिकांशी संवाद साधला. ऑपरेशन सिंदूरनं जगभरातल्या दहशतवादाविरुद्धच्या लढ्याला नवा विश्वास आणि उत्साह दिला असल्याचं ते म्हणाले.

या मोहिमेनंतर संपूर्ण देशात वोकल फॉर लोकल या संकल्पनेलाही नवी ऊर्जा मिळाली आहे, असं सांगून प्रत्येकानं स्वदेश निर्मित वस्तूंना प्राधान्य देण्याचा निर्धार करावा असं आवाहन पंतप्रधानांनी केलं.

नुकत्याच झालेल्या खेलो इंडिया स्पर्धेत, देशभरातल्या क्रीडापटूंनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचं त्यांनी कौतुक केलं. यावेळी महाराष्ट्रातल्या अस्मिता ढोणे आणि साईराज चौधरी यांचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. 20 मे रोजी साजरा झालेल्या जागतिक मधमाशी दिनाच्या अनुषंगानं विचार मांडताना ते म्हणाले की; मध केवळ गोडवा नाही तर आरोग्य, स्वयंरोजगार आणि स्वावलंबनाचं उदाहरण आहे. मधमाशांचं संरक्षण आणि संवर्धनासाठी होत असलेल्या प्रयत्नांबद्दल बोलताना, मोदी यांनी पुण्यातल्या अमित गोडसे यांच्या कामाचा आवर्जून उल्लेख केला. देशाच्या नक्षलग्रस्त भागात आता मूलभूत सोयी-सुविधा पोहोचत असल्याचं सांगताना महाराष्ट्रातल्या गडचिरोली जिल्ह्यातल्या काटेझरी गावात पहिल्यांदाच बस सेवा पोहचल्याचं उदाहरण त्यांनी दिलं. ते म्हणाले...

**काटेझरी में आए इस परिवर्तन को आसपास के पूरे क्षेत्र में महसूस किया जा रहा है। अब यहां हालात तेजी से सामान्य हो रहे हैं। माओवाद के खिलाफ सामूहिक लड़ाई से अब ऐसे क्षेत्रों तक भी बुनियादी सुविधाएं पहुंचने लगी है।**

**एनडीए परिषद**

भाजप शासित मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची एक दिवसीय परिषद पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल दिल्लीत झाली. या परिषदेत पंतप्रधानांनी विकासाचा वेग वाढवण्यावर आणि नागरिकांना डबल इंजिन सरकारचा फायदा मिळावा यावर भर दिला. भाजपच्या, सु-शासन विभागानं आयोजित केलेल्या या बैठकीत सु-शासनाच्या मुद्द्यांवर दीर्घ विचारमंथन झालं.यावेळी ऑपरेशन सिंदूरच्या यशासाठी भारतीय संरक्षण दल आणि पंतप्रधानांचं अभिनंदन करण्यात आलं तर केंद्र सरकारच्या जातिय जनगणना करण्याच्या निर्णयाबद्दल ही अभिनंदन करण्यात आलं. परिषदेला भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि संरक्षणमंत्री राजनाथ सिंह उपस्थित होते. तसंच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासह भाजपाशासित सर्व 20 राज्यांचे मुख्यमंत्री आणि 18 उपमुख्यमंत्री उपस्थित होते.

**भारत-अर्थव्यवस्था**

जपानला मागे टाकत भारतीय अर्थव्यवस्था जगातली चौथी मोठी अर्थव्यवस्था ठरली आहे. पुढील अडीच ते तीन वर्षाच्या काळात भारत जर्मनीलाही मागं टाकून, तिसऱ्या स्थानावर पोहोचण्यासाठी सज्ज असल्याचं नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी व्ही आर सुब्रमण्यम यांनी म्हटलं आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या आकडेवारीनुसार, भारत आता चार हजार अब्ज डॉलर्सची अर्थव्यवस्था असल्याचं त्यांनी नीती आयोगाच्या दहाव्या संचालन मंडळाच्या बैठकीनंतर बोलताना सांगितलं. आता केवळ अमेरिका, चीन आणि जर्मनी या देशांची अर्थव्यवस्था भारतीय अर्थव्यवस्थेपेक्षा मोठी असल्याचं त्यांनी नमूद केलं. आगामी काळात भारत जगात सगळ्यात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था राहील असं आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं स्पष्ट केलं आहे.

**सर्वपक्षीय-शिष्टमंडळ**

काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय भारतीय संसदीय शिष्टमंडळ काल गयाना इथं पोहोचलं. दहशतवादाविरोधातला भारताचा स्पष्ट संदेश देण्यासाठी हे शिष्टमंडळ गयाना इथं गेलं असून, भारत दहशतवादाविरुद्धच्या लढाईत दृढ आणि एकजूट आहे असं गयानामधल्या भारतीय दुतावासानं समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. न्यूयॉर्कमधल्या  भारतीय वाणिज्य दूतावासानं आयोजित केलेल्या भारतीय-अमेरिकन समुदायाच्या प्रमुख सदस्यांच्या निवडक गटासह आणि आघाडीच्या प्रसारमाध्यमांच्या आणि विचारवंतांच्या समूहाशी सुद्धा या शिष्टमंडळानं संवाद साधला. यावेळी थरूर आणि शिष्टमंडळातील इतर सदस्यांनी न्यू यॉर्कमधल्या 9/11 च्या स्मारकाला भेट दिली.

याशिवाय, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय शिष्टमंडळानं कतारमधल्या आघाडीच्या वृत्तपत्रांच्या संपादकीय पथकाशी काल संवाद साधला. त्यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतरच्या घडामोडींवरील भारताचा दृष्टिकोन आणि भारताच्या धोरणाबद्दल सांगितलं. या शिष्टमंडळानं मध्य पूर्व जागतिक व्यवहार परिषदेलाही भेट दिली आणि भारताच्या दहशतवादविरोधी धोरणावर चर्चा केली.

बहरीनमध्ये, भाजप खासदार बैजयंत जय पांडा यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय शिष्टमंडळानं बहरीनचे उपपंतप्रधान शेख खालिद बिन अब्दुल्ला अल खलिफा यांना भारतासमोरील सीमापार दहशतवादाच्या आव्हानाबद्दल आणि

त्याच्याशी लढण्यासाठीच्या दृढ संकल्पाबद्दल माहिती दिली. यानंतर ते कुवेतला भेट देणार आहे. जनता दल संयुक्त पक्षाचे खासदार संजय झा यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय शिष्टमंडळानं दक्षिण कोरियाचे माजी परराष्ट्र मंत्री डॉ. यून यंग-क्वान यांच्यासह प्रख्यात कोरियन मान्यवरांशीही संवाद साधला.

दरम्यान, द्रमुक खासदार कनिमोळी करुणानिधी यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय शिष्टमंडळ दहशतवादाविरुद्ध भारताचा संदेश जगापर्यंत पोहोचवण्यासाठी स्लोव्हेनियाला पोहोचलं आहे तर भाजप नेते रवीशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वातील प्रतिनिधि मंडळ फ्रांस मध्ये पोहोचलं आहे.

**उपराष्ट्रपती-मध्यप्रदेश दौरा**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज एक दिवसाच्या मध्य प्रदेश दौऱ्यावर जात आहेत. नरसिंगपूर इथं आयोजित तीन दिवसीय कृषी उद्योग संमेलनाचं उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. मध्य प्रदेशमधल्या कृषी-आधारित अर्थव्यवस्थेला प्रक्रिया आणि मूल्यवर्धनाशी जोडून गुंतवणूक, नवोपक्रम आणि रोजगाराची नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी या उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. ड्रोन आणि एआय-आधारित कृषी उपकरणं, पॉलीहाऊस, सेंद्रिय आणि नॅनो खतं, तसंच कृषी नवोपक्रमांवर आधारित 90 हून अधिक दालनं या संमेलनात उभारण्यात आली आहेत.

**पंतप्रधान-गुजरात**

पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांच्या हस्ते आज गुजरात मधल्या दाहोद इथं 24 हजार कोटी खर्चाच्या विविध विकास कामांच्या प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन होणार आहे. गुजरातच्या 2 दिवसांच्या दौऱ्यात ते दाहोद लोकोमोटिव्ह उत्पादन संयंत्र देशाला समर्पित करणार आहेत. या संयंत्रामुळे पुढील 11 वर्षांत 1 हजार 200 मालगाड्यांच्या इंजिनांची निर्मिती होऊन रेल्वेच्या मालवहन क्षमतेत वाढ होणार आहे. यामुळे सरकारच्या मेक इन इंडिया उद्दिष्टासोबतच जगभरातल्या निर्यातीमुळे मेक फॉर वर्ल्ड उद्दिष्टाचीही पूर्तता होणार आहे.

**अमित शहा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आजपासून दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. आज सकाळी त्यांच्या हस्ते जामठा इथल्या राष्ट्रीय कर्करोग संस्थेत स्वस्ती निवासचं भूमिपूजन, कामठी तहसीलमधल्या चिंचोली इथ एन एफ एस यू च्या कॅम्पसच भूमिपूजन त्यांच्या हस्ते होणार आहे. यानंतर अमित शहा नांदेड मध्ये जाहीर सभा घेणार आहेत. या जाहीर सभेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि भाजपचे इतर वरिष्ठ नेते उपस्थित राहणार आहेत. उद्या शहा मुंबईतल्या श्री नारायण मंदिर माधवबाग आणि सर कावसजी जहांगीर हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत.

**खेलो इंडिया**

दीवच्या समुद्र किनाऱ्यावर झालेल्या खेलो इंडिया बीच क्रीडा स्पर्धेची काल सांगता झाली. या पहिल्याच बीच स्पर्धेत महाराष्ट्राने 5 सुवर्ण पदकांसह, 5 रौप्य, आणि 10 कास्य अशी एकंदर 20 पदकं जिंकत उपविजेतेपद पटकावलं. मणिपूर संघाला विजेतेपद मिळालं. महाराष्ट्राने पेंचक सिलटमध्ये 3 सुवर्ण, 4 रौप्य आणि 5 कास्य अशी एकंदर 12 पदकांची कमाई करीत वर्चस्व गाजवले. सागरी जलतरणातही 2 सुवर्ण, 1 रौप्य आणि 2 कास्य पदकं मिळवली. बीच सॉकर,

बीच कबड्डी या सांघिक खेळात कांस्य पदकावर महाराष्ट्राच्या खेळाडूंनी नाव कोरलं. केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते महाराष्ट्राला उपविजेतेपदाचा करंडक प्रदान करण्यात आला.

**<u>मान्सून</u>**

महाराष्ट्राच्या विविध भागात अद्यापही पावसाचा जोर कायम आहे. दरम्यान, नैऋत्य मोसमी पाऊस काल दक्षिण कोकणात दाखल झाला असून, तो यावर्षी नेहमीपेक्षा 10 दिवस आधीच राज्यात दाखल झाला आहे. या पार्श्वभूमीवर राज्याच्या कृषी विभागानं शेतकऱ्यांना महत्त्वाचा सल्ला दिला आहे. आगामी दोन दिवस पावसाचे असले तरी 27 मे पासून पावसाचं प्रमाण हळूहळू कमी होईल; मे महिन्याच्या शेवटी कोकण वगळता बहुतांश भागात पाऊस विश्रांती घेण्याची शक्यता आहे, त्यामुळे पावसाची अपेक्षा करून शेतकऱ्यांनी कोरडवाहू जमिनीवर पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.